www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**C**

# Paper-III
# JOURNALISM AND MASS COMMUNICATION

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) .........................................
   (Name) ................................................
2. (Signature) .........................................
   (Name) ................................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. .............................................................
(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## JAN - 19318

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **40** Number of Questions in this Booklet : **75**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **75** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

Prepp Your Personal Exam Guide

www.prepp.in



Your Personal Exam Guide

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



# Journalism and Mass Communication
## Paper III
# पत्रकारिता आणि जनसंचार
## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This paper contains **Seventy Five** (75) multiple choice questions. Each question carries **Two** (2) marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर** (75) बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन** (2) गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Which of the following is the most appropriate method to study the nuances of gate-keeping process that shapes news selection and presentation in a typical news room ?
   (A) Survey of readers
   (B) Field observation
   (C) Content analysis of news
   (D) Semiotic analysis of news

2. 'Attribution' in journalism jargon means :
   (A) Telling readers where the information in a news story comes from
   (B) Telling readers the source who does not want to be identified
   (C) Acknowledgement of reporter
   (D) When editor becomes a reporter for a news story

1. बातमीची निवड व सादरीकरणावर प्रभाव टाकणारी संपादकीय विभागातील द्वारपाल निवड प्रक्रिया आणि त्यातील बारकावे यांचे संशोधन करण्यासाठी खालीलपैकी कोणती पद्धत सर्वात योग्य आहे ?
   (A) वाचकांचे सर्वेक्षण
   (B) क्षेत्रीय निरीक्षण
   (C) बातम्यांचे आशय विश्लेषण
   (D) बातम्यांचे चिह्नशास्त्रीय विश्लेषण

2. पत्रकारितेच्या परिभाषेत 'ॲट्रिब्युशन' या इंग्रजी संकल्पनेचा अर्थ सांगा :
   (A) बातमीतील माहिती कोठून मिळाली याची वाचकांना कल्पना देणे
   (B) आपली ओळख उघड होऊ नये असे वाटणाऱ्या स्रोताची माहिती वाचकांना देणे
   (C) पत्रकाराची घेतली गेलेली दखल
   (D) उपसंपादक एखाद्या वृत्ताकरिता पत्रकार बनतो अशी स्थिती

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



3. Kiran Karnik, a prominent Indian Telecom and media expert oversaw the launch of the following channel in South Asia :

(A) National Geographic

(B) Discovery

(C) History

(D) TLC

4. A pejorative term that refers to supporting or promoting of a cause exclusively through online activism :

(A) Civil Disobedience

(B) Litigation

(C) Plagiarism

(D) Armchair activism

3. भारतातील ख्यातनाम दूरसंचार आणि माध्यमतज्ञ किरण कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली पुढीलपैकी कोणत्या वाहिनीच्या दक्षिण आशियातील प्रक्षेपणास सुरुवात झाली ?

(A) नॅशनल जिओग्राफिक

(B) डिस्कव्हरी

(C) हिस्टरी

(D) टी.एल.सी.

4. एखाद्या प्रश्नाच्या वा समस्येच्या पुरस्कारार्थ अथवा जाहिरातीकरिता केवळ इंटरनेटच्या माध्यमातून दाखवलेल्या कृतिशीलतेला कोणत्या तिरस्कार व्यंजक संकल्पनेने संबोधले जाते ?

(A) सविनय कायदेभंग

(B) दावा

(C) वाङ्मयचौर्य

(D) आरामखुर्ची कृतिशीलता

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



5. The concept 'Agency' from sociology also used in cultural studies refers to :

(A) The question about whether individuals act independently or are acted upon

(B) The way in which the media set public agendas of debate

(C) A term loosely used to describe angst

(D) Mediation between editor of the newspaper and reporter

6. The encoding/decoding model of communication was first developed by which of the following scholars ?

(A) Stuart Hall

(B) John Fiske

(C) Michel Foucault

(D) George Gerbner

5. समाजशास्त्र तसेच संस्कृतीअभ्यास विद्याशाखेत वापरल्या जाणाऱ्या 'एजेन्सी' संकल्पनेचा अर्थ काय ?

(A) लोक स्वयंप्रेरित असतात की परप्रेरित यावरचे प्रश्नचिन्ह

(B) माध्यमांची जनमत प्राधान्यक्रम तथा चर्चा घडवून आणण्याची पद्धती

(C) जनमनातील अस्वस्थतेला साधारपणे संबोधणारी संकल्पना

(D) संपादक आणि वृत्तपत्रांचे वार्ताहर यांमधील समायोजन

6. संज्ञापनाचा संकेतन/विरूपण प्रतिमान कोणत्या माध्यमतज्ञाने विकसित केले ?

(A) स्टुअर्ट हॉल

(B) जॉन फिस्क

(C) मिशेल फुको

(D) जॉर्ज गर्बनर

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



7. The first Marathi fortnightly newspaper was bilingual. In which two languages did the newspaper publish ?

(A) Marathi and Gujarati

(B) Marathi and English

(C) Marathi and Konkani

(D) Marathi and Portuguese

8. In implementing public relations plan which of the following public relations practitioners do first ?

(A) Send as many press releases as possible to as many people

(B) Determine which media outlets best serve their purpose

(C) Art editors to promise to use their press releases

(D) Find out which media have been most friendly to their client in the past

7. पहिले मराठी पाक्षिक वर्तमानपत्रे द्वैभाषिक होते. कुठल्या दोन भाषांत ते प्रकाशित व्हायचे ?

(A) मराठी आणि गुजराथी

(B) मराठी आणि इंग्रजी

(C) मराठी आणि कोंकणी

(D) मराठी आणि पोर्तुगीज

8. जनसंपर्काची योजना राबवताना सर्वात अगोदर जनसंपर्क अधिकारी काय करतात ?

(A) शक्य तितक्या प्रेस रिलीज अधिकाधिक लोकांना पाठवितात

(B) कुठल्या वृत्त संस्था उपयोगाच्या आहेत याचा मागोवा घेतात

(C) संपादकांकडून प्रेस ही रिलीज छापण्याचे आश्वासन घेतात

(D) आपल्या पक्षाकाराशी कुठल्या माध्यमाचे मैत्रीचे नाते आहे ते पाहतात

www.prepp.in



9. A research design that does not involve random assignment of subjects to experimental groups is called :
   (A) Controlled experiment
   (B) Semi-random experiment
   (C) Quasi-experiment
   (D) Neo-quasi experiment

10. "Although media is an industry, it is not just any other industry or business." Which of the following reason provides the best explanation of the statement ?
    (A) Media is a very capital intensive industry
    (B) Media products have a strong public dimension in production and consumption
    (C) Media ownership gets concentrated in fewer hands
    (D) Media products are primarily meant for immediate entertainment

9. संशोधन आराखडा, ज्यामध्ये प्रतिसादकांची यादृच्छिक पद्धतीने प्रयोगगटामध्ये नेमणूक केली जात नाही त्यास काय म्हटले जाते ?
   (A) नियंत्रित प्रयोग
   (B) अर्धयादृच्छिक प्रयोग
   (C) निमप्रायोगिक
   (D) नवनिम प्रयोग

10. "माध्यम हा एक उद्योग असला तरी तो असाच इतर कोणताही उद्योग नाही." पुढीलपैकी कोणते कारण वरील विधानाचे सर्वात योग्य स्पष्टीकरण देते ?
    (A) माध्यम उद्योगाला खूप भांडवल लागते
    (B) निर्मिती आणि उपभोग अशा दोन्ही पातळ्यांवर माध्यम उत्पादनांना एक लक्षणीय असा सार्वजनिक हिताचा आयाम असतो
    (C) माध्यमांची मालकी ही कमी जणांकडे एकवटत जाते
    (D) माध्यमांच्या उत्पादनाचा मुख्य हेतू तात्काळ मनोरंजनाचा असतो

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



11. What sort of sources should journalists look for ?
    (A) A variety of sources representing different opinions
    (B) Close friends and relatives
    (C) Officials who win expert some favour in return
    (D) Officials with whom the journalist has a close personal relation

12. According to Manuel Castells, in a network society, communications technologies allow for what ?
    (A) Annihilation of space
    (B) Rapid and asychronous communication
    (C) Changes the relation to time
    (D) All of the above

11. पत्रकारांनी कुठल्या प्रकारच्या स्रोतांकडे जावे ?
    (A) वेगवेगळी मते असलेले विविध स्रोत
    (B) जवळील मित्र व कुटुंबीय
    (C) असे अधिकारी जे माहितीच्या मोबदल्याची अपेक्षा करतात
    (D) ज्या अधिकाऱ्यांशी पत्रकाराचा घनिष्ठ संबंध आहे.

12. मॅन्युअल कॅस्टल्सनुसार 'नेटवर्क सोसायटी' मध्ये संज्ञापन तंत्रज्ञानातून काय शक्य आहे ?
    (A) अवकाश नष्ट होतो
    (B) जलद आणि असंक्रमित संज्ञापन
    (C) काळाशी नाते बदलते
    (D) वरील सर्व पर्याय

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



13. Which of the following is a short term unplanned effect in the typology of media effects ?

(A) Media campaign

(B) Collective reaction

(C) Development diffusion

(D) Socialization

14. Which of the following dimensions *does not* guide the dominant paradigm of development communication ?

(A) Capitalism

(B) Counter-culture

(C) Modernization

(D) Surveillance

15. Publication of wrong or incorrect map is a very serious offence because it adversely affects the territorial integrity of the country. What should a media enterprise do in such a case according to the Press Council of India ?

(A) Apologise only

(B) Promptly and prominently retract with regrets

(C) It is part of freedom of speech and expression so nothing should be done

(D) Write to the ministry of information and broadcasting

13. माध्यम परिणामांच्या वर्गीकरणाच्या संदर्भात खालीलपैकी कोणता अल्पमुदतीचा अनियोजित परिणाम ठरतो ?

(A) माध्यमांची प्रचारमोहिम

(B) सामुहिक प्रतिक्रिया

(C) विकासाचे अभिसरण

(D) सामाजिकीकरण

14. पुढीलपैकी कोणता परिमाण/आयाम विकास संज्ञापनाच्या प्रस्थापित विचारव्यूहाशी सुसंगत **नाही** ?

(A) भांडवलशाही

(B) प्रती-संस्कृती

(C) आधुनिकता

(D) पर्यवेक्षण

15. देशाच्या भौगोलिक अखंडतेवर नकारात्मक परिमाण होतो म्हणून देशाचा नकाशा चुकीचा छापू नये. असे झालेच तर माध्यम संस्थेने काय करावे असे प्रेस कॉऊन्सिल ऑफ इंडियाचे म्हणणे आहे ?

(A) केवळ माफी मागावी

(B) त्वरित आणि ठळकपणे माघार घ्यावी व माफी मागावी

(C) अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भाग असल्यामुळे काहीही करू नये

(D) माहिती व प्रसारण मंत्रालयाला कळवावे

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



16. Who among the following is known as the father of public relation ?
    (A) Joseph Goebbels
    (B) Adolf Hitler
    (C) Edward Bernays
    (D) Wilbur Schramm

17. Who first translated Bhagvad Gita into English ?
    (A) Charles Wilkins
    (B) Macaulay
    (C) William Jones
    (D) Lord Bentington

18. Which one of the following is warm colour ?
    (A) Blue
    (B) Green
    (C) Red-orange
    (D) Blue-violet

16. खालीलपैकी कोणाला जनसंपर्काचा जनक म्हणून संबोधले जाते ?
    (A) जोसेफ गोबेल्स
    (B) अ‍ॅडॉल्फ हिटलर
    (C) एडवर्ड बर्निस
    (D) विल्बर श्राम

17. भगवतगीतेचा इंग्रजी अनुवाद सर्वप्रथम कोणी केला ?
    (A) चार्ल्स विल्किन्स
    (B) मकॉले
    (C) विल्यम जोन्स
    (D) लॉर्ड बँटिन्गटन

18. खालीलपैकी कोणता रंग उष्ण आहे ?
    (A) निळा
    (B) हिरवा
    (C) लाल–नारंगी
    (D) निळा-जांभळा

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



19. Who among the following is known as the pioneer of Hindi journalism ?
(A) Ganga Kishore Bhattacharya
(B) Baburao Vishnu Paradkar
(C) Prem Chand
(D) Madhav Sapre

20. "When you have two competing theories that make exactly the same predictions, the simpler one is better." This approach is termed as :
(A) Surveying
(B) Parsimony
(C) Levelling
(D) Disharmony

19. खालीलपैकी कोणाला हिंदी पत्रकारितेचे जनक म्हटले जाते ?
(A) गंगा किशोर भट्टाचार्य
(B) बाबूराव विष्णू पराडकर
(C) प्रेमचंद
(D) माधव सप्रे

20. "ज्यावेळी तुमच्यासमोर दोन तुल्यबन उपपत्ती अगदी समान निष्कर्षाचे अंदाज वर्तवीत असतात त्यावेळी सोपी उपपत्ती अधिक चांगली" या दृष्टिकोनास काय म्हणतात ?
(A) सर्व्हेयिंग
(B) पार्सिमनी
(C) लेव्हलिंग
(D) डिसहार्मनी

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



21. Media advocates have to rely on journalist working in commercial media organisations. How does this constrain their abilities ?
    - (A) It constrains their ability to reach policy makers and citizen because commercial media have their own agenda
    - (B) It constrains their ability because journalists in commercial media ask for money
    - (C) It contains their ability because commercial media only look for profit from content
    - (D) It constrains their ability because media advocates are poor

22. What is meant by balance in a news story ?
    - (A) Giving the same amount of space to every paragraph
    - (B) Getting a lawyer's opinion before writing an article
    - (C) Having several authors write a story
    - (D) Covering all sides of an issue as fairly as possible

21. माध्यम अधिवक्त्यांना व्यापारी माध्यम संस्थामधे काम करणाऱ्या पत्रकारांवर अवलंबून राहाते लागते यामुळे त्यांच्यावर कुठले निर्बंध येतात ?
    - (A) व्यापारी माध्यम संस्थांचा स्वत:चा एजेंडा असतो ज्यामुळे धोरण बनवणारे आणि नागरिक यांच्यापर्यंत पोहोचता येत नाही
    - (B) व्यापारी माध्यम संस्थांतील पत्रकार पैसे मागतात
    - (C) व्यापारी माध्यम संस्था सर्व विषयांतून नफा कमावण्याचा विचार करतात
    - (D) माध्यम अधिवक्ता गरीब असतात

22. बातमीत समतोल राखणे म्हणजे काय ?
    - (A) प्रत्येक परिच्छेदाला सारखीच जागा देणे
    - (B) बातमी लिहायच्या अगोदर वकीलाचे मत घेणे
    - (C) एखादी बातमी अनेक लेखकांकडून लिहून घेणे
    - (D) एखादा विषयाच्या सर्व बाजू न्याय्यपणे मांडणे

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



23. Sopt the odd one out :

(A) Zomato

(B) Ola

(C) Uber

(D) Meru

24. Name the media effect research which claims that people gradually come to accept to view of world as portrayed on television as a true representation of reality :

(A) Motivational analysis

(B) Discourse analysis

(C) Visual analysis

(D) Cultivation analysis

25. In the year 2003-2004, the Hutton enquiry survey initiated a news organisation of unethical practice. Which of the following was the news organisation ?

(A) CNN

(B) BBC

(C) Fox News

(D) CNBC

23. वेगळा पर्याय ओळखा :

(A) झोमॅटो

(B) ओला

(C) उबर

(D) मेरू

24. लोक दूरचित्रवाणीच्या आशयात होणाऱ्या बाह्य जगताच्या चित्रणाला वास्तव समजून त्याचा स्वीकार करतात, असे प्रतिपादन करणाऱ्या माध्यम परिणाम अभ्यासाचे नाव लिहा :

(A) मोटिव्हेशनल ॲनालिसिस (प्रेरक विश्लेषण)

(B) डीसकोर्स ॲनालिसिस (प्र–वचन विश्लेषण)

(C) व्हिज्यूयल ॲनालिसिस (दृश्य–विश्लेषण)

(D) कल्टीव्हेशन ॲनालिसिस (संस्कृतीकरण विश्लेषण)

25. वर्ष 2003-2004 मधे हट्टन समितीने एका बातम्या पुरविणाऱ्या संस्थेविरुद्ध अनैतिक वर्तन केल्याबाबत ताशेरे ओढले. खालीलपैकी कुठली ती संस्था होती ?

(A) सी.एन.एन.

(B) बी.बी.सी.

(C) फॉक्स न्यूज

(D) सी.एन.बी.सी.

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



26. Identify the wrong statement from at the statements given below :

(A) Visual radio is a convergent technology that combines FM radio with mobile phone

(B) Worldspace was the first private satellite radio platform set up in India

(C) DAB (Digital Audio Broadcasting) was introduced in AIR in mid 1990's

(D) The Chanda committee recommended a review of Vividh Bharti to make it more innovative and experimental

27. 'A film studio owing a cinema hall chain' and 'a leading national newspaper buying out another national newspaper' are examples of :

(A) Vertical concentration of ownership

(B) Horizontal concentration of ownership

(C) Vertical and Horizontal concentration of ownership respectively

(D) Horizontal and vertical concentration of ownership respectively

26. पुढीलपैकी चुकीचे विधान कोणते ?

(A) दृश्य–नभोवाणी एफ.एम. नभोवाणी आणि मोबाईल फोन यांचे एकत्रिकरण करणारे एकात्मिक तंत्रज्ञान आहे

(B) वर्ल्डस्पेस हे भारतात स्थापन झालेली प्रथम खाजगी उपगृह नभोवाणी आहे

(C) डी.ए.बी. (अंकीय ध्वनी प्रसारण) तंत्रज्ञानाचा स्वीकार ऑल इंडिया रेडीओने नव्वदीच्या दशकाच्या मध्यात केला

(D) विविध भारतीय सेवेला अधिक नाविन्यपूर्ण तथा प्रायोगिक करण्याकरिता तिचा आढावा देण्याची सूचना चंदा समितीने केली

27. 'एखाद्या चित्रपटनिर्मिती संस्थेने चित्रपटगृहांच्या साखळीचीही मालकी मिळविणे' व 'एका राष्ट्रीय वृत्तपत्राने दुसरे राष्ट्रीय वृत्तपत्र विकत घेणे' ही कशाची उदाहरणे आहेत ?

(A) मालकी एकवटण्याची उभी प्रक्रिया

(B) मालकी एकवटण्याची आडवी प्रक्रिया

(C) मालकी एकवटण्याची अनुक्रमे उभी व आडवी प्रक्रिया

(D) मालकी एकवटण्याची अनुक्रमे आडवी व उभी प्रक्रिया

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



28. What is plagiarism ?

(A) Making up quotations or sources for a news story

(B) Taking someone else's words or ideas and passing them off as one's own

(C) Pretending to be someone other than a reporter to get an interview

(D) Accepting gifts or bribes from sources

29. In research, a combination of concepts that is created to describe specific situation is called :

(A) Abstract

(B) Construct

(C) Aim

(D) Hypothesis

28. वाङ्मयचौर्य म्हणजे काय ?

(A) एखाद्या बातमीसाठी विधाने किंवा स्रोत तयार करणे

(B) दुसऱ्याचे शब्द, विचार स्वतःचे म्हणून सांगणे

(C) एखादी मुलाखत मिळविण्यासाठी आपण दुसरेच कोणी असल्याचा भास निर्माण करणे

(D) स्रोतांकडून भेटवस्तू किंवा लाच घेणे

29. संशोधनात विशिष्ट परिस्थितीच्या वर्णनाकरिता केलेल्या विविध संकल्पनांच्या जुळणीला काय म्हणतात ?

(A) ॲबस्ट्रॅक्ट (सारांश)

(B) कंस्ट्रक्ट (परियोजन)

(C) एम (ध्येय)

(D) हायपोथिसिस (अभ्युपगम)

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



30. When should a reporter publish a rumour that a public official has engaged in an illicit sexual relationship ?

(A) Immediately before any other news organization does it

(B) Only after the rumour has been confirmed as true and its has some news value

(C) If the source of the remour is reputable

(D) Never publish such a story

31. In the context of history of television in India, identify the *incorrect* pair from the following :

(A) 1970s—Beginning of TV

(B) 1980s—Beginning of colour transmission

(C) 1990s—Spread of private channels

(D) 2000s—Beginning of direct to home TV transmission

30. एखादा सार्वजनिक अधिकारी अनैतिक लैंगिक संबंध ठेवून आहे अशी अफवा वार्ताहराने केव्हा प्रकाशित करावी ?

(A) कुठल्याची इतर संस्थेने छापाण्याच्या अगोदर त्वरित

(B) अफवा खरी आहे आणि तीत बातमी मूल्य आहे असे पडताळून पाहिल्यावर

(C) जर अफवेचे स्रोत प्रतिष्ठित असेल तर

(D) अशी बातमी छापू नये

31. भारतातील दूरचित्रवाणीच्या इतिहसाच्या संदर्भात खालीलपैकी कोणती जोडी चूक आहे ?

(A) 1970 चे दशक—दूरचित्रवाणीची सुरुवात

(B) 1980 चे दशक—रंगीत प्रसारणाची सुरुवात

(C) 1990 चे दशक—खासगी दूरचित्रवाणी वाहिन्यांचा प्रसार

(D) 2000 चे दशक—डायरेक्ट टू होम टी.व्ही. प्रसारणाची सुरुवात

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



32. In shooting, an optical movement called 'zoom' is to some extent similar to which of the following physical camera movement ?

(A) Dolly

(B) Tilt

(C) Pan

(D) Track

33. Which of the following is *not* among the basic elements of investigative reporting laid down by the Press Council of India ?

(A) The subject should be of public importance for the reader to know

(B) The subject should be true

(C) An attempt is being made to hide the truth from the people

(D) It has to be the work of the reporter, not of others he is reporting

32. चित्रीकरणामध्ये, 'झूम' या ऑप्टीकल हालचालीच्या कमी अधिक प्रमाणात समदृश्य असणारी कॅमेराची प्रत्यक्षातील हलचाल पुढीलपैकी कोणती ?

(A) डॉली

(B) टिल्ट

(C) पॅन

(D) ट्रॅक

33. प्रेस काऊंसिलच्या निर्देशानुसार खालीलपैकी कुठला शोधपत्रकारितेचा घटक **नाही** ?

(A) शोधाचा विषय सार्वजनिक हिताचा आणि वाचकांना माहिती असणे आवश्यक असा असावा

(B) शोधाचा विषय सत्य असावा

(C) लोकांपासून संबंधित विषय लपवून ठेवण्याचा प्रयत्न होत असावा

(D) हे काम वार्ताहराचे स्वत:चे असावे, दुसऱ्या कोणी माहिती मिळविलेली नसावी

34. Which pair of media from the following has an extensive local penetration and coverage ?

(A) Magazines and community radio

(B) TV and Newspapers

(C) Newspapers and Community Radio

(D) Social Media and Community Radio

34. पुढीलपैकी कोणत्या माध्यम जोडीची स्थानिक पोहोच आणि व्याप्ती सर्वाधिक आहे ?

(A) मासिक आणि सामुदायिक नभोवाणी

(B) दूरचित्रवाणी आणि वृत्तपत्रे

(C) वृत्तपत्रे आणि सामुदायिक नभोवाणी

(D) समाजमाध्यमे आणि सामुदायिक नभोवाणी

35. Where is a 'Likert Scale' used ?

(A) For measuring strength of a signal

(B) In research and statistical analysis

(C) To determine length of a TV programme

(D) In WhatsApp messaging

35. 'लिकर्ट स्केल' कुठे वापरले जाते ?

(A) संदेशाची तीव्रता मोजण्यासाठी

(B) संशोधनात संख्याशास्त्रीय विश्लेषणाकरिता

(C) दूरचित्रवाणी कार्यक्रमाचे कालावधी ठरवण्याकरिता

(D) वॉट्सॲप संदेश प्रसारणाकरिता

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



36. Identify the *incorrect* pair of media and its regulatory body in India from the following :

(A) Newspaper—PCI

(B) News Channels—NBSA

(C) Film—CBFI

(D) Advertising—ASCI

37. In the context of research "SMOG Grading" refers to :

(A) A measure of readability based on the number of syllables per word

(B) Measuring the report/article quantitatively for analysis

(C) It is name of codebook in content analysis

(D) Checking reliability and readability of respondent

36. भारतातील माध्यमे आणि त्यांची नियामक संस्था यांची खालीलपैकी चूक जोडी ओळखा :

(A) वृत्तपत्रे—पी.सी.आय.

(B) वृत्तवाहिन्या—एन.बी.एस.ए.

(C) चित्रपट—सी.बी.एफ.आय.

(D) जाहिरात—ए.एस.सी.आय.

37. संशोधनाच्या संदर्भात 'स्मॉग ग्रेडींग' म्हणजे काय ?

(A) प्रत्येक शब्दातील व्यंजनसंख्येनुसार वाचनीयतेचे केलेले मापन

(B) विश्लेषणाकरिता अहवाल/लेखाचे संख्यात्मक रीतीने केलेले मापन

(C) आशय विश्लेषणातील एका संकेततालिकेचे नाव

(D) प्रतिसादकाची विश्वासार्हता आणि वाचनीयता याची तपासणी

www.prepp.in



38. Bernard Cohen observed that the media may not be successful much of the time in feeling people. What to think, but it is stunningly successful in telling audiences what to think about. What is this theory called ?

(A) Agenda setting

(B) Public relations

(C) Cultivation

(D) Media effects

39. In research, a single question in a questionnaire that requires two separate responses is called :

(A) Double barreled question

(B) Double blind experiment

(C) Dummy variable

(D) Deception

38. बर्नार्ड कोहेन ने सांगितले की लोकांनी काय विचार करावा हे सांगण्यात फारशी यशस्वी होत नाहीत मात्र लोकांनी कशाबाबत विचार करावा हे सांगण्यात मात्र माध्यमांना अभूतपूर्व यश मिळते. या उपपत्तीला काय नाव आहे ?

(A) अजेंडा सेटिंग

(B) पब्लिक रिलेशन्स

(C) कल्टिव्हेशन

(D) मीडिया इफेक्ट्स

39. संशोधनामध्ये, प्रश्नावलीमधील एका प्रश्नाच्या उत्तराकरिता जर दोन वेगवेगळ्या पर्यायांची आवश्यकता भासत असेल, तर अशा प्रश्नास काय म्हणतात ?

(A) डबल बॅरल्ड क्वेश्चन

(B) डबल ब्लाइन्ड एक्सपेरीमेंट

(C) डमी व्हेरीएबल

(D) डिसेप्शन

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



40. What is a review ?

(A) An article about movies only

(B) Feedback a reporter get from his editor

(C) An article that helps consumers decide whether or not they should buy a product

(D) An article that criticises

41. Which of the following is *not* a correct statement in the context of CBFC as a regulatory body in India ?

(A) It is set up under Cinematography Act (1952) and Cinematograph Rules (1958)

(B) It has a revising committee which can take a second look at the film

(C) CBFC issues four types of certificates for film exhibition

(D) Once a certificate is issued by CBFC, the film content cannot be challenged in the court

40. समालोचन म्हणजे काय ?

(A) केवल चित्रपटांवरील लेख

(B) संपादकाकडून वार्ताहराला मिळालेली प्रतिक्रिया

(C) असा लेख ज्यामुळे ग्राहकांना एखादी वस्तू विकत घ्यावी अथवा नाही हा निर्णय घेता येईल

(D) टीका करणारा लेख

41. भारतातील एक नियामक संस्था असलेल्या 'सीबीएफसी'च्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान योग्य विधान ठरत **नाही** ?

(A) सिनेमॅटोग्राफी कायदा (1952) आणि सिनेमॅटोग्राफ नियमावली (1958) यांच्या तरतुदीखाली या संस्थेचे स्थापना झाली आहे

(B) चित्रपटाच्या पुनर्परीक्षणासाठी पुनर्निरीक्षण समितीची तरतूद सी.बी.एफ.सी. मध्ये आहे

(C) चित्रपटांच्या प्रदर्शनासाठी सी.बी.एफ.सी. चार प्रकारची प्रमाणपत्रे देते

(D) एकदा सी.बी.एफ.सी. ने चित्रपटाला प्रदर्शनाचे प्रमाणपत्र दिले की त्यातील आशयाविरुद्ध न्यायालयात दाद मागता येत नाही

42. In the context of audio-visual production which of the technical person is responsible for judging the distance between the camera and a subject and physically manipulating the lens on the camera to keep subject in focus ?

(A) Technical director

(B) Cinematographer

(C) Focus puller

(D) Continuity person

**Instructions (Q. Nos. 43, 44 and 45) :**

Read the following passage and answer the next three questions :

Paul Roberts thinks a society that wants it "now" is untenable. According to Roberts the dangers

42. दृकश्राव्य कार्यक्रम निर्मितीसंदर्भात, अशी तांत्रिक व्यक्ती जिच्याकडे कॅमेरा आणि अभिनेता यातील अंतराचा अंदाज घेऊन अभिनेत्याला फोकसमध्ये ठेवण्याची जबाबदारी असते त्या व्यक्तीला काय म्हणतात ?

(A) तांत्रिक दिग्दर्शक

(B) छायालेखक

(C) फोकस पुलर

(D) सातत्य निरीक्षक

**निर्देश (43, 44 व 45) :**

पुढील परिच्छेद वाचून त्यानंतरच्या तीन प्रश्नांची उत्तर द्या :

पॉल रॉबर्टस यांच्या मते ज्या समाजाला सर्वकाही 'आता' हवे आहे असा समाज शक्य नाही. रॉबर्ट्सच्या मते धोके खूप मोठे आहेत. प्रत्येक

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



are many. "With each transaction and upgrade, each device and click, life moves closer to us and the world becomes 'our' world. "Our society is in the process of merging the self with the market, he fear's part of this merger is involuntary. Google, Apple, Facebook and Microsoft have supplied consumer data to the Government. Now the movements of each person, all information of each individual is available from the beginning of life till the end. This was possible because government and market came together. However, if we are being watched without our knowledge and involuntarily then we also have to admit that we also

व्यवहारानंतर, अपग्रेड नंतर, प्रत्येक निवड, प्रत्येक क्लिक नंतर, जीवन आपल्या जवळ येते आणि जग 'आपले' जग बनते.'' आपला समाज स्वत्व आणि बाजार यांचे विलीनीकरण होईल की काय अशी भीती ते व्यक्त करतात. यातले काही विलीनीकरण अनिच्छेने होते आहे. गूगल, अपल, फेसबुक आणि मायक्रोसॉफ्ट यांनी आपल्या ग्राहकांची माहिती सरकारला पुरविली आहे. आता प्रत्येक व्यक्तीची सगळी हालचाल, त्याची सर्व माहिती उपलब्ध आहे. जीवनाच्या सुरुवातीपासून ते अंतापर्यंत. हे घडले कारण सरकार आणि बाजार एकत्र आले. मात्र जर आपल्यावर आपल्या नकळत आणि आपल्या अनिच्छेने लक्ष ठेवले जात असेल तर तेही मान्य केले पाहिजे की आपणही त्याच यंत्रणेचा वापर करून इतरांवर लक्ष ठेवायला लागलो आहोत. तसे लक्ष ठेवायला

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



use the same system to monitor the lives of others. We are infant eager to watch the lives of others. We are thus bring our privacy and we are providing the money, resources ourselves. We have questioned our privacy and to be a spectator of this auction we pay.

43. Why is the process of the merger of the self with the market involuntary ?

(A) Because we are disinterested

(B) Because Google etc. supply data to government without our knowledge

(C) Because Paul Roberts says so

(D) Because it is necessary

आता आपण आतूर असतो. या अर्थाने आपण आपल्याच खाजगीपणाला हरवत जातो आहोत आणि या प्रक्रियेला लागणारा पैसा, साधने, आपणच पुरवितो आहोत. आपल्या खाजगी–पणाचा आपणच लीलाव मांडला आहे आणि तो लीलाव पाहण्यासाठी आपणच पैसे मोजत आहोत.

43. आपले स्वत्व आणि बाजार यांचे विलीनीकरण अनिच्छेने का होते आहे ?

(A) कारण आपल्याला त्यात रस नाही

(B) कारण गूगल इत्यादी आपली माहिती आपल्या नकळत सरकारला पुरवीत आहे

(C) कारण पॉल रॉबर्ट्स तसे म्हणतो

(D) कारण ते आवश्यक आहे

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



44. How does Government have all data about individuals ?

(A) Because Google supplied consumer data to government

(B) Because government controls media

(C) Because government and market come together

(D) Because market and corporate come together

45. According to Paul Roberts what are we eager to do now and what are we losing as a result ?

(A) We are eager to watch the lives of others and losing our privacy as a result

(B) We are losing knowledge and involuntarily losing our privacy

(C) We are losing privacy and are eager to gain knowledge

(D) We are eager to get information about others and losing our privacy

44. सरकारकडे व्यक्तींबाबतची संपूर्ण माहिती कशी येते ?

(A) कारण गूगल आपल्या ग्राहकांची माहिती सरकारला देतो

(B) कारण सरकारचे माध्यमांवर नियंत्रण आहेत

(C) कारण सरकार आणि बाजार एकत्रित आले

(D) कारण मार्केट आणि कॉर्पोरेट एकत्रित आले

45. पॉल रॉबर्टसनुसार आपण काय करण्यास उत्सुक आहोत आणि त्यामुळे आपण काय हरवतो आहोत ?

(A) आपण दुसऱ्यांचे जगणे बघण्यास उत्सुक आहोत परिणामी आपले खाजगीपण हरवतो आहोत

(B) आपण ज्ञान हरवतो आहोत आणि अजाणतेपणे आपली खाजगीपण हरवतो आहोत

(C) आपण आपले खाजगीपण हरवतो आहोत आणि ज्ञान मिळवण्यास उत्सुक आहोत

(D) आपण दुसऱ्यांच्याबाबत माहिती मिळविण्यास उत्सुक आहोत आणि आपले खाजगीपण हरवतो आहोत

www.prepp.in

Your Personal Exams Guide



46. "Men look, women appear." All mass media objectifies women. Which media theorist introduced us to this phenomenon ?
    (A) Marshall McLuhan
    (B) Ian Van Djik
    (C) John Berger
    (D) Neil Postman

47. Which of the following statements is *not* a correct description about the regime of internet regulation ?
    (A) Internet is a very easy medium to regulate within national jurisdiction
    (B) Much of burden of internet regulation falls on internet service providers
    (C) Multiple national and international bodies are incorporated in Internet regulation
    (D) Much of internet developed in a spirit of defacto freedom from control

46. ''पुरुष पाहतात, स्त्रीया दिसतात.'' सर्वच जनमाध्यमे स्त्रियांचे वस्तूकरण करतात याबाबींकडे कुठल्या माध्यम अभ्यासकाने सर्वप्रथम आपले लक्ष वेधले ?
    (A) मार्शल मॅक्लूहन
    (B) यान वान डिजक
    (C) जॉन बर्जर
    (D) नील पोस्टमॅन

47. इंटरनेटवरील नियमनाच्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान योग्य वर्णन ठरत **नाही** ?
    (A) इंटरनेट हे राष्ट्रीय न्यायकक्षेत नियमन करण्यासाठी अगदी सोपे माध्यम आहे
    (B) इंटरनेटवरील नियमनाची बरीचशी जबाबदारी इंटरनेट सेवा पुरवठादारावर येऊन पडते
    (C) इंटरनेट नियमनामध्ये बऱ्याच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांचा अंतर्भाव होतो
    (D) इंटरनेटचा बहुतेक विकास नियंत्रणापासून जवळजवळ मुक्ती अशा तत्वाच्या प्रभावा-खाली झाला

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



48. What is the difference between libel and slander ?

(A) Libel is written and slander is oral untrue defamatory statement

(B) Libel is oral and slander is written untrue defamatory statement

(C) There is no difference between the two

(D) Libel is defamation, slander is not

49. In semiotics, a property of signs/texts which can have multiple meanings :

(A) Paradigm

(B) Polysemic

(C) Populism

(D) Syntagm

48. बेअब्रू करणे आणि निंदा करणे यात काय फरक आहे ?

(A) खोटे, बदनामीकारक लिहिले तर त्याला बेअब्रू करणे आणि बोलले तर निंदा करणे म्हणतात

(B) खोटे, बदनामीकारक बोलले तर त्याला बेअब्रू करणे आणि लिहिले तर निंदा करणे होते

(C) दोन्हीमधे काहीच फरक नाही

(D) बेअब्रू करण्यात बदनामी होते, निंदा करण्यात बदनामी होत नाही

49. बव्हर्थी लक्षणाला काय म्हणतात–चिन्हशास्त्रानुसार, चिन्हाच्या :

(A) पॅराडिग्म

(B) पॉलीसेमीक

(C) पॉप्युलिसम

(D) सिंटॅग्म

50. Movies such as The Cabinet of Dr. Caligari, "Metropolis" and "Psycho" are examples of films influenced by which movement ?

(A) Social realism

(B) Neo-realism

(C) Surrealism

(D) Expressionism

51. Which committee recommended in 1964 the separation of AIR and Doordarshan (TV) as two independent corporations ?

(A) Joshi Committee

(B) Murdoch Committee

(C) Verghese Committee

(D) Chanda Committee

50. ''द कॅबीनेट ऑफ डॉक्टर कॅलीगरी'', 'मेट्रोपोलिस' आणि 'सायको' हे चित्रपट कोणत्या चळवळीच्या प्रभावाची उदाहरणे आहेत ?

(A) सामाजिक वास्तववाद

(B) नववास्तववाद

(C) अतिवास्तव

(D) अभिव्यक्तीवाद

51. 1964 मध्ये, कोणत्या समितीने ए.आय.आर. आणि दूरदर्शन यांचे दोन वेगवेगळ्या आस्थापनां-मध्ये विभागणी करावी अशी शिफारस केली ?

(A) जोशी समिती

(B) मरडॉक समिती

(C) वर्गीस समिती

(D) चंदा समिती

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



52. Who among the following is *not* associated with the cultural studies approach ?

(A) Richard Hoggart

(B) Louis Althusser

(C) Antonio Gramsci

(D) David Easten

53. A non-probability sampling technique that is used by researchers to identify potential subjects in studies where subjects are hard to locate is called :

(A) Random sampling

(B) Snowball sampling

(C) Quota sampling

(D) Theoretical sampling

52. खालीलपैकी कोणाचा संबंध सांस्कृतिक अभ्यास दृष्टिकोणाशी जोडला जात **नाही** ?

(A) रिचर्ड होगार्ट

(B) लुई आल्थूझर

(C) आन्तोनिओ ग्रामसी

(D) डेविड ईस्टन

53. असा अभ्यास ज्यामध्ये प्रतिसादक मिळणे अवघड ठरते अशा अभ्यासात संशोधकाने प्रतिसादक मिळवण्याकरिता वापरलेल्या असंभाव्यता नमुनानिवड तंत्राला काय म्हणतात ?

(A) रॅन्डम सॅम्पलिंग (यादृच्छिक नमुनानिवड पद्धती)

(B) स्नोबॉल सॅम्पलिंग (हिमप्रपाती नमुनानिवड पद्धती)

(C) क्वोटा सॅम्पलिंग (वाटा-आधारित नमुनानिवड पद्धती)

(D) थिअरीटीकल सॅम्पलिंग (औपपत्तिक नमुनानिवड पद्धती)

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



54. Many media organisations carry out public opinion polls by appealing people to participate in it by sending SMS or visiting websites. What major objection can be raised on the scientific validity of such research on the basis of sampling ?

(A) Purposive sampling in such polls leads to bias

(B) Unqualified volunteer sampling in such polls leads to bias

(C) Random sampling in such polls introduces bias

(D) Quota sampling in such polls produces bias

55. In the context of theory of 'Sadharanikaran', the concept of 'Sahahriday' means :

(A) an ability to perceive a situation in a unique way

(B) an innate receptivity acquired through culture and learning

(C) an ability to argue a point in a logical way

(D) an innate compassion at heart for other people

54. अनेक वृत्तपत्रे वा वृत्तवाहिन्या आपल्या वाचक वा प्रेक्षकांना एस.एम.एस. द्वारे वा वेबसाईटद्वारे त्यांच्या जनमत चांचण्यांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करतात. नमुना निवडीच्या मुद्याच्या आधारे अशा संशोधनाच्या वैधतेवर कोणता आक्षेप घेता येऊ शकतो ?

(A) अशा चाचण्यांमधील सहेतुक नमुन्यामुळे निष्कर्ष दोष होतात

(B) अपात्र स्वेच्छा नमुन्यामुळे निष्कर्षामध्ये दोष निर्माण होतात

(C) यादृच्छिक नमुन्यामुळे निष्कर्ष सदोष निघतात

(D) वाटा आधारित नमुन्यामुळे निष्कर्षामध्ये दोष निर्माण होतात

55. साधारणीकरण या उपपत्तीच्या (सिद्धान्ताच्या संदर्भात 'सहहृदय' म्हणजे काय ?

(A) एखादी परिस्थिती समजून घेण्याची एकमेवाद्वितीय मार्ग

(B) संस्कृती आणि शिक्षणातून उत्स्फूर्तपणे निर्माण होणारी ग्रहणक्षमता

(C) एखादा मुद्दा तर्कशुद्धपणे मांडण्याची दक्षता

(D) इतर लोकांप्रती हृदयामध्ये असलेली सहवेदना

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



56. Which one of the following films was co-produced and directed by Jabbar Patel and dealt with, among other things, lesbianism ?

(A) Uttarayan

(B) Umbartha

(C) Vidushak

(D) Maza Ghar

57. Who received the first prestigious "Dada Saheb Phalke Award" for Indian Cinema ?

(A) Pankaj Mullick

(B) Sulochana

(C) Naushad

(D) Devika Rani

56. खालीलपैकी कुठला चित्रपट जब्बार पटेल यांनी सहनिर्मित आणि दिग्दर्शित केला, ज्यात इतर विषयांसोबत, स्त्रियांमधील समलैंगिकतेचा विचार मांडण्यात आला ?

(A) उत्तरायण

(B) उंबरठा

(C) विदूषक

(D) माझं घर

57. भारतीय चित्रपटक्षेत्रातील योगदानाकरिता दिला जाणारा प्रतिष्ठेचा दादासाहेब फाळके पुरस्कार सर्वप्रथम कोणास दिला गेला ?

(A) पंकज मलिक

(B) सुलोचना

(C) नौशाद

(D) देविकाराणी

Prepp Your Personal Exam Guide

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



58. Which of the following is *not* the direct and useful measure to ensure external validity of a research ?

(A) Conducting a through literature review

(B) Using random sampling method

(C) Conducting a research over a long period of time

(D) Replicating research over heterogeneous sample

59. What condition is *not* important for effective communication ?

(A) Command over language

(B) Clear communication objective

(C) Personality

(D) Command on content

60. In the context of concentration of ownership on internet what does the 'Long tail' phenomenon imply ?

(A) A large number of websites owned by a single owner

(B) A large number of websites attracting very high user traffic

(C) A large number of websites owned by established mass media owner

(D) A large number of websites attract very little user traffic

58. संशोधनातील बहिर्गत वैधता उंचावण्यासाठी खालीलपैकी कोणती थेट व उपयुक्त कृती ठरत **नाही** ?

(A) संदर्भसाहित्याचा सखोल आढावा घेणे

(B) यादृच्छिक नमुन्याचा वापर करणे

(C) संशोधन एका प्रदीर्घ कालावधीमध्ये करत राहाणे

(D) बहुविध नमुन्यांवर संशोधनाची पुनरावृत्ती करणे

59. परिणामकारक संज्ञापनासाठी खालील कोणती पूर्व अट असू शकत **नाही** ?

(A) भाषेवरील प्रभुत्व

(B) संज्ञापन उद्दिष्टाबाबत स्पष्टता

(C) व्यक्तिमत्त्व

(D) आशयावरील प्रभुत्व

60. इंटरनेटवरील वेबसाईट मालकीच्या एकवटी-करणाच्या संदर्भात 'लांबुळके शेपूट' ही संकल्पना पुढीलपैकी कोणता अर्थ सुचित करते ?

(A) एकाच मालकाच्या ताब्यात अनेकानेक वेबसाईट्स असणे

(B) खूप साऱ्या वेबसाईट्सवर वापरकर्त्यांची प्रचंड वाहतूक/वापर सुरू असणे

(C) प्रस्थापित प्रसार माध्यमांच्याच ताब्यात खूप साऱ्या वेबसाईटस्चीही मालकी असणे

(D) खूप साऱ्या वेबसाईट्सवर वापरकर्त्यांची फारच तुरळक रहदारी/वापर असणे

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



61. The concept of 'imagined audiences' in media is similar to :
    (A) Subscribers
    (B) 'Inscribed Readers'
    (C) Reviewers
    (D) Prescribed listeners

62. 'Amar Chitra Khata' and 'Tinkle' comics were founded by :
    (A) R. K. Laxman
    (B) Anant Pai
    (C) Mario Miranda
    (D) Unni Krishnan

63. When compared with production value, the selling price of mainstream newspaper is always :
    (A) Less
    (B) More
    (C) Equal
    (D) Not fixed

61. माध्यमांमध्ये इमॅजिनड् ऑडीयन्सेस (कल्पित ग्राहक) ही संकल्पना पुढीलपैकी कोणत्या संकल्पनेसारखी आहे ?
    (A) सबस्क्रायबर्स (वर्गणीदार)
    (B) इनस्क्राइब्ड रीडर्स (समाविष्ट वाचक)
    (C) रिव्हीवर्स (परीक्षक)
    (D) प्रिस्क्राइब्ड लिसनर्स (विहित श्रोते)

62. 'अमर चित्रकथा' आणि 'टिंकल कॉमिक्स' यांची स्थापना कोणी केली ?
    (A) आर.के. लक्ष्मण
    (B) अनंत पै
    (C) मारीओ मिरांडा
    (D) उन्नी कृष्णन

63. मुख्यप्रवाहातील वृत्तपत्रांची विक्रीकिंमत ही त्यांच्या निर्मितीखर्चापेक्षा नेहमी :
    (A) कमी असते
    (B) जास्त असते
    (C) समान असते
    (D) निश्चित नसते

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



64. What is the name of the Act that governs internet usage in India ?

(A) Cable Television Networks (Regulation) Act, 1995

(B) Airport Authority of India Act, 1994

(C) Information Technology Act, 2000

(D) Right to Information Act, 2005

65. Identify the *correct* chronology of launch of the following Marathi GEC's

(A) Alpha Marathi, Zee Yuva, ETV Marathi, Star Pravah

(B) Alpha Marathi, ETV Marathi, Star Pravah, Zee Yuva

(C) ETV Marathi, Alpha Marathi, Star Pravah, Zee Yuva

(D) ETV Marathi, Star Pravah, Alpha Marathi, Zee Yuva

64. भारतातील (आंतरजाल) इंटरनेटच्या वापराचे नियमन कोणत्या कायद्याद्वारे होते ?

(A) केबल टेलिव्हिजन नेटवर्क्स (रेग्युलेशन) अॅक्ट, 1995

(B) एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडिया ॲक्ट, 1994

(C) इन्फॉरमेशन टेक्नोलॉजी ॲक्ट, 2000

(D) राईट टू इन्फॉरमेशन ॲक्ट, 2005

65. पुढील मराठी मनोरंजन वाहिन्यां सुरू होण्याचा योग्य कालानुक्रम शोधा :

(A) अल्फा मराठी, झी युवा, ई टिव्ही मराठी, स्टार प्रवाह

(B) अल्फा मराठी, ई टिव्ही मराठी, स्टार प्रवाह, झी युवा

(C) ई टिव्ही मराठी, अल्फा मराठी, स्टार प्रवाह, झी युवा

(D) ई टिव्ही मराठी, स्टार प्रवाह, अल्फा मराठी, झी युवा

www.prepp.in



66. In the context of PR, the most appropriate way to cope with a negative event that may lead to negative publicity is to :

(A) Discourage news coverage of the event

(B) Deny the event occurred

(C) Hire a new content writer

(D) Facilitate news coverage

67. What is P. Sainath mainly known for ?

(A) Writing about education

(B) Writing about agriculture

(C) Writing about science and technology

(D) Writing about cultural issues

66. जनसंपर्काच्या संदर्भात, एखादी नकारात्मक घटना ज्यामुळे अप्रसिद्धी होऊ शकेल हाताळण्याची सर्वोत्तम पद्धती कोणती ?

(A) अशा घटनेच्या बातमीचे हनन

(B) घटनेच्या अस्तित्वाचा अस्वीकार

(C) नवीन आशय लेखकाची निवड

(D) वार्तांकनाची केलेली सोय

67. पी. साईनाथ यांना प्रामुख्याने कशाकरिता ओळखले जाते ?

(A) शिक्षणविषयक लेखन

(B) कृषीविषयक लेखन

(C) विज्ञान आणि तंत्रज्ञानविषयक लेखन

(D) सांस्कृतिक प्रश्नांविषयक लेखन

www.prepp.in



68. What is the meaning of the term 'cultural imperialism' ?

(A) Western cultural aspects are important for popularity and progress of media

(B) Western nations dominate the views and social cultures in the third world using media

(C) Ethnic cultures are superiors to any others in the world of media

(D) Imperialism has nothing to do with culture as media

69. A phenomenon involving the interconnection of information and communication technologies, computer networks and media content is called as :

(A) mass communication

(B) digital diffusion

(C) digital connectivity

(D) media convergence

68. 'सांस्कृतिक साम्राज्यवाद' संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करा :

(A) माध्यमांच्या विकास तथा लोकप्रियतेकरिता पाश्चिमात्य संस्कृती घटकांची आवश्यकता

(B) पाश्चिमात्य देशांचे विकसनशील देशांच्या मतनिर्धारण आणि सामाजिक संस्कृतीवर असणारे प्राबल्य

(C) माध्यम जगतात, वंशविशिष्ट संस्कृतींचे अन्य संस्कृतीपेक्षा जास्त असणारे महत्त्व

(D) संस्कृती एक माध्यम या संकल्पनेशी साम्राज्यवादाचा नसणारा संबंध

69. माहिती आणि संज्ञापन तंत्रज्ञान संगणकीय जाळे आणि माध्यमातील आशय यांच्यातील आंतरसंबंध प्रस्थापित होत जाण्याच्या प्रक्रियेला कोणती संज्ञा वापरली जाते ?

(A) जनसंज्ञापन (मास कम्युनिकेशन)

(B) डिजिटल अभिसरण (डिजिटल डिफ्यूजन)

(C) डिजिटल संपर्कशीलता (डिजिटल कनेक्टीव्हीटी)

(D) माध्यम एकात्मीकरण (मीडिया कन्वहर्जन्स)

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



70. Which among the following were the main objectives of the newspaper 'Darpan' ?

(1) To educate people with western knowledge

(2) Create public opinion for development of society

(3) Promote Swadeshi

(4) Promote Swaraj

(A) (1) and (3) are correct

(B) (2) and (3) are correct

(C) (1) and (2) are correct

(D) (2) and (4) are correct

71. Which of the following is *not* a film about news media ?

(A) Ace in the Hole

(B) Citizen Kane

(C) All the President's Men

(D) Silence

70. 'दर्पण' वर्तमानपत्राची मुख्य उद्दिष्ट्ये खालीलपैकी कुठली होती ?

(1) लोकांपर्यंत पाश्चात्य ज्ञान पोहोचविणे

(2) समाजाच्या विकासासाठी जनमत तयार करणे

(3) स्वदेशीचा पुरस्कार करणे

(4) स्वराज्याचा पुरस्कार करणे

(A) (1) आणि (3) बरोबर आहेत

(B) (2) आणि (3) बरोबर आहेत

(C) (1) आणि (2) बरोबर आहेत

(D) (2) आणि (4) बरोबर आहेत

71. खालीलपैकी कुठला बातम्यांशी संबंधित संस्थेवरील चित्रपट **नाहीत** ?

(A) एस इन दि होल

(B) सिटिझेन केन

(C) ऑल दि प्रेसिडेंट्स मेन

(D) सायलन्स

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



72. Which of the following is *not* considered to be the significant characteristic of popular Indian films in the established discourse of film theories ?

(A) Intrumption oriented narrative flow

(B) Emphasis on dialogues and verbal communication

(C) Traditional and patriarchial underpinning to story

(D) Highly subtle and restrained treatment of narrative

73. 'Tone of speaking' and 'speed of speaking' are the examples of :

(A) Non-verbal and verbal communication respectively

(B) Verbal and non-verbal communication respectively

(C) Only non-verbal communication

(D) Only verbal communication

72. चित्रपटविषयक प्रस्थापित औपपत्तिक चौकटीमध्ये खालीलपैकी कोणते मुख्य प्रवाहातील वा लोकप्रिय भारतीय चित्रपटांचे एक प्रमुख वैशिष्ट्य मानले जात **नाही** ?

(A) कथानकाची व्यत्ययाने भरलेली मांडणी

(B) खटकेबाज संवाद आणि शब्दबंबाळ संभाषणांवर भर

(C) पारंपरिक व पितृसत्ताक विचारप्रणालीचे कथेला असेलेले अस्तर

(D) अत्यंत सूक्ष्म आणि संयत अशी कथानकाची हाताळणी

73. उच्चारणातील ध्वनीच्छटा (टोन) व बोलण्याचा वेग ही कशाची उदाहरणे आहेत ?

(A) अनुक्रमे नि:शब्द व सशब्द संज्ञापनाची

(B) अनुक्रमे सशब्द व नि:शब्द संज्ञापनाची

(C) फक्त नि:शब्द संज्ञापनाची

(D) फक्त सशब्द संज्ञापनाची

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



74. Padam Shri, Asgari Bai is a popular :

(A) Bharatnatyam Dancer

(B) Khayal Singer

(C) Dhrupad Singer

(D) Kuchipudi Dancer

75. What does "Androcentric View" mean ?

(A) Male perspective

(B) Female perspective

(C) Transgender perspective

(D) Senior citizens perspective

74. पदमश्री असगरीबाई कोणत्या क्षेत्राशी संबंधित आहेत ?

(A) भरतनाट्यम नर्तिका

(B) ख्याल गायिका

(C) ध्रुपद गायिका

(D) कुचीपुडी नर्तिका

75. ॲण्ड्रोसेंट्रिक दृष्टिकोन म्हणजे काय ?

(A) पुरुषाचा दृष्टिकोन

(B) स्त्रीचा दृष्टिकोन

(C) संदिग्ध लैंगिकता दृष्टिकोन

(D) वरिष्ठ नागरिकांचा दृष्टिकोन

www.prepp.in



ROUGH WORK